RNI No. MAHBIL/२००९/३१७३३

महाराष्ट्र शासन राजपत्र
असाधारण भाग चार-अ

Reg. No. SCS/१७३/२०१६-१८

वर्ष २, अंक ३१(२)] शुक्रवार एप्रिल १, २०१६/चैत्र १२, शके १९३८ पृष्ठ २, किंमत : रुपये १५.००

असाधारण क्रमांक ५९

प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिध्द केलेले नियम व आदेश यांव्यतिरितक्त) नियम व आदेश.**

**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**

**मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ एप्रिल २०१६.**

**आदेश**

**अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ आणि सॉल्वंन्ट, रॅफिनेट व स्लॉप (संपादन, विक्री, साठवण आणि मोटार वाहनांमध्ये वापरास प्रतिबंध) आदेश, २०००.**

क्रमांक याचिका. २२१५/प्र.क्र. ८२/ नापू-२४ ----ज्याअर्थी, अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ याच्या कलम ३ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन आणि सॉल्वंन्ट, रॅफिनेट व स्लॉप (संपादन, विक्री, साठवण आणि मोटार वाहनांमध्ये वापरास प्रतिबंध) आदेश, २००० (यात यापुढे ज्याचा निर्देश “केंद्रिय आदेश” असा करण्यात आला आहे.) याच्या खंड ३ च्या उप-खंड (१) च्या तरतुदींचे अनुसरण करुन, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र सॉल्वंन्ट, रॅफिनेट व स्लॉप (अनुज्ञापन) आदेश २००७ (ज्यात यापुढे ज्याचा निर्देश “राज्य आदेश” करण्यात आला आहे.) काढलेला आहे.

आणि ज्याअर्थी, राज्य आदेशाच्या वैधतेस व विधिग्राह्यतेस २०१४ ची याचिका क्रमांक ४०२९ अनुसार मुंबई येथील मुंबई उच्च न्यायालयामध्ये आव्हान देण्यात आले होते, आणि मुंबई उच्च न्यायालय, मुंबई यांनी उक्त याचिकेवर, ती याचिका अंशत: यशस्वी ठरलेली आहे आणि राज्य आदेशाच्या खंड ३ चा उपखंड (ब) शून्य व निरर्थक ठरविण्यात आला असून त्याद्वारे तो रद्दबातल व रद्द करण्यात येत आहे. असा निर्णय दिला होता ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनास राज्य आदेशाच्या खंड ३ चा उप-खंड (ब) त्यातून वगळणे, इष्ट वाटते ;

त्याअर्थी, आता, अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ याच्या कलम ३ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन आणि सॉल्वंन्ट, रॅफिनेट व स्लॉप (संपादन, विक्री, साठवण आणि मोटार वाहनांमध्ये वापरास प्रतिबंध) आदेश, २००० याच्या खंड ३ च्या उपखंड (१) च्या तरतुदींचे अनुसरण करुन आणि याबाबतीत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन याद्वारे, महाराष्ट्र सॉल्वन्ट, रॅफिनेट व स्लॉप (अनुज्ञापन) आदेश, २००७ मध्ये पुढील प्रमाणे सुधारणा करण्याकरिता पुढील आदेश करीत आहे:-

१. या आदेशास, महाराष्ट्र सॉल्वन्ट, रॅफिनेट व स्लॉप (अनुज्ञापन) आदेश, २०१६ असे म्हणावे.
२. महाराष्ट्र सॉल्वंन्ट, रॅफिनेट व स्लॉप (अनुज्ञापन) आदेश, २००७ च्या खंड ३ मधील उप-खंड (ब) वगळण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,
सुभाष लाखे,
शासनाचे सहसचिव

**FOOD, CIVIL SUPPLIES AND CONSUMER PROTECTION DEPARTMENT**

**Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya Annexe,**

**Mumbai 400 032, Dated the 1st April 2016.**

**Order**

**Essential Commodities Act, 1955 And Solvent, Raffinate And Slop (ACQUISITION, SALE, STORAGE, AND PREVENTION OF USE IN AUTOMOBILES) ORDER, 2000**

No. Yachika 2215/C.R. 82/Napu-24---- Whereas, in exercise of the power conferred by section 3 of the Essential Commodities Act, 2015 and in pursuance of the provision of sub-clause (1) of clause 3 of the Solvent, Raffinate and Slop (Acquisition, Sale, Storage and Prevention of Use in Automobile) Order, 2000 (hereinafter referred as "the Central Order") the Government of Maharashtra has made the Maharashtra, Solvent, Raffinate and Slop (Licensing) Order, 2000 (hereinafter referred as "the State Order") ;

And Whereas, the legality and validity of the State Order was challenged in the High Court of Judicature At Bombay under the Writ Petition No. 4029 of 2014: and the High Court of Judicature At Bombay in the said Writ Petition held that the petition succeeds in part and sub-clause (b) of clause 3 of the State Order is null and void and is quashed and set aside ;

And Whereas, the Government of Maharashtra considers it expedient to omit sub-clause (b) of clause 3 of the State Order ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by section 3 of the Essential Commodities Act, 1955 and in pursuance of the provision of sub-clause (1) of clause 3 of the Solvent, Raffinate, and Slop(Acquisition, Sale, Storage and Prevention of Use in Automobile) Order, 2000 and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following Order so as to amend the Maharashtra Solvent, Raffinate and Slop(Licensing) Order, 2007, as follows, namely:-

1. This Order may be called the Maharashtra Solvent, Raffinate, and Slop (Licensing) Order, 2016
2. In clause 3 of the Maharashtra Solvent, Raffinate, and Slop (Licensing) Order, 2007, sub-clause (b) shall be deleted.

By Order and in the name of the Governor of Maharashtra,

**SUBHASH LAKHE**
**Joint Secretary to Government.**